# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad
# Date: 07 October 2023
# Time 01.00 to 01.05 PM
# Language Marathi

## आकाशवाणी औरंगाबाद
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक : ०७ ऑक्टोबर २०२३ दुपारी १.०० वा.

****

चीनमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतानं शंभर पदकं जिंकत आतापर्यंतची ऐतिहासिक कामगिरी केली आहे. यात २५ सुवर्ण, ३५ रौप्य आणि ४० कांस्य पदकांचा समावेश आहे. आज सकाळी महिलांच्या कबड्डी स्पर्धेत भारतानं सुवर्णपदक पटकावलं. तीरंदाजीच्या कंपाउंड प्रकारात वैयक्तिक स्पर्धेत भारताच्या ज्योती सुरेखा तसंच ओजस देवतळेनं सुवर्ण पदक पटकावलं. दोघांचंही या स्पर्धेतलं हे तिसरं सुवर्णपदक आहे. याच प्रकारात अभिषेक वर्माने रौप्य पदक तर आदिती गोपीनाथ हिने कांस्यपदक पटकावलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या खेळाडुंचं अभिनंदन केलं आहे.

दरम्यान, तीरंदाजीत सुवर्ण पदक जिंकणारा ओजस हा नागपुरचा असून, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्याचं अभिनंदन केलं आहे. ओजसच्या आई अर्चना देवतळे यांनी या शब्दात आपला आनंद व्यक्त केला:

***''पुर्ण फॅमिली, पुर्ण आमच्या एरियातली लोकं सुद्धा खूप खूष आहेत. ढोल ताशे लावून त्यांनी पुर्ण एंजॉय केला, त्याचं गोल्ड मेडल आल्यावर.''***

****

एक्स, युट्युब आणि टेलीग्राम या समाजमाध्यमांनी बाल लैंगिक अत्याचाराशी संबंधित मजकूर त्यांच्या प्लॅटफॉर्मवरुन त्वरीत काढून टाकण्यासंदर्भात, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं, या यंत्रणांना नोटीस बजावली आहे. अशी पोस्ट करणाऱ्यांना या प्लॅटफॉर्मवर प्रवेश देणं त्वरीत बंद करावं, असंही या सूचनांमध्ये नमूद करण्यात आलं आहे. भविष्यात बाल लैंगिक अत्याचाराचा प्रसार रोखण्यासाठी मसुदा प्रसारित करण्यासंदर्भातील अल्गोरिदम आणि कुणी अशा प्रकारची पोस्ट केल्यास त्याची त्वरीत दखल घेण्यासंदर्भातील यंत्रणा सक्रिय कशी करता येईल, यावर लक्ष केंद्रित करावं असं या कंपन्यांना सांगण्यात आलं आहे.

****

दोन हजार रुपयांच्या नोटा बदलण्यासाठी, भारतीय रिझर्व्ह बँकेनं दिलेली मुदत आज संपत आहे. यापूर्वी ३० सप्टेंबरला, रिझर्व्ह बँकेनं या नोटा बदलण्यासाठी एका आठवड्याची मुदत वाढवून दिली होती. आतापर्यंत ८७ टक्के नोटा बँकेत जमा करण्यात आल्या आहेत.

****

उपमुख्यमंत्री अजित पवार आज नाशिकच्या दौऱ्यावर असून, ते वणी कडे जात असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी कांदे आणि टोमॅटो त्यांच्या मोटारी समोर फेकून ताफा अडवण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी तातडीने या कार्यकर्त्यांना ताब्यात घेतलं. कांदा आणि टोमॅटोच्या घसरत्या भावाकडे लक्ष वेधण्यासाठी या कार्यकर्त्यांनी हे आंदोलन केलं.

****

भारतीय वायूसेनेचे वायू दल प्रमुख विवेक राम चौधरी यांचा संदेश उद्या सकाळी सात वाजून दहा मिनिटांनी आकाशवाणीवरून प्रसारित करण्यात येणार आहे. त्यामुळे उद्या रविवारी सकाळी आमच्या केंद्रावरचं मराठी बातमीपत्र सकाळी सात वाजून वीस मिनिटांनी प्रसारित होणार आहे.

****

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये घेण्यात येणाऱ्या बारावी परीक्षेसाठी ९ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर दरम्यान नियमित शुल्कासह ऑनलाईन पद्धतीने अर्ज करता येतील. उच्च माध्यमिक शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालयांनी हे अर्ज करायचे आहेत. अधिक माहितीसाठी डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू डॉट महा एच एस सी बोर्ड डॉट इन या संकेतस्थळाला भेट द्यावी, असं आवाहन राज्य शिक्षण मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी केलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेत अडकलेल्या ठेवी परत करण्यासंदर्भात योग्य ती प्रक्रिया करणार असल्याचा दिलासा, राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी दिला आहे. ते काल छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकारांशी बोलत होते. असे अनेक प्रकार समोर येत आहेत, अशा घोटाळ्यामुळे सहकार विभागाची बदनामी होत असल्याचं सांगत, सहकार आयुक्तांना या प्रकरणी कारवाईची सूचना देण्यात आल्याचं वळसे पाटील यांनी सांगितलं.

****

जागतिक टपाल दिन आणि राष्ट्रीय टपाल सप्ताहानिमित्त टपाल विभागाअंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ९ ते १३ ऑक्टोंबर दरम्यान विविध कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. यात कार्यालयाची स्वच्छता मोहीम, टपाल विभागाच्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी विशेष मेळावा, विद्यार्थ्यांसाठी टपाल तिकीट संग्रहाबद्दल शिबिर आणि प्रश्नमंजूषा कार्यक्रम, कर्मचाऱ्यांसाठी कार्यशाळा, चर्चासत्र आदी कार्यक्रमांचा यात समावेश आहे.

*****

आदिलाबाद - नांदेड, नांदेड - आदिलाबाद इंटरसिटी एक्स्प्रेस तसंच तिरुपती - आदिलाबाद आणि आदिलाबाद - तिरुपती एक्सप्रेस येत्या दहा तारखेपर्यंत रद्द करण्यात आल्याचं दक्षिण मध्य रेल्वेनं कळवलं आहे.

दरम्यान, दक्षिण मध्य रेल्वे विभागात रेल्वेमार्गाच्या कामामुळे काचीगुडा ते नगरसोल एक्स्प्रेस येत्या १०, १२ आणि १४ तारखेला मुदखेड ते परभणी दरम्यान साडे तीन तास उशीरा धावणार आहे. तर, औरंगाबाद-हैदराबाद एक्स्प्रेस ९ ते १५ ऑक्टोबर दरम्यान औरंगाबाद रेल्वे स्थानकावरून एक तास दहा मिनिटे उशिरा सुटणार आहे.

****